# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः-१९/०८/२०१६

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १६/०८/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणालाही न सांगता घरुन निघुन गेल्याने यातील संशयीत आरोपीने तीच्या अल्पवयीन वयाचा फायदा उचलुन तीला फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल स्लीप झाल्याने एकाचा मृत्यु, तीन जखमी . :-**

दिनांक १८/०८/२०१६ रोजी ०६.४५ वा. पुर्वी. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल वर ४ सिट बसवुन अती वेगाने, हयगयीने चालवुन वळणावर मोटार सायकलचे संतुलन बिघडल्याने डांबरी रोडचे स्लोपवर असलेल्या सिमेंट दगडाला धोप शिवार राज्य मार्ग येथे धडक मारुन स्वतः व कु. तनु वय ०६ वर्ष, व मागे बसलेला नंदकिशोर बिसेन यास जखमी करण्यास व मुलगा मोहीत हेमराज राहांगडाले वय १० वर्ष, याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ)भादंवि सहकलम १८४/१७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. म्हैसकर पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) अवैधरित्या जनावरांना कोंबुन निर्दयतेची वागणुक देवून वाहतुक करतांना मिळून आल्याने गुन्हा नोंद . . :-**

दिनांक १७/०८/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ३ म्हशी, ५ लहान हेले, एकुण किमती ५५,०००/-रु. असे एकुण आठ जनावरे वाहनात निर्दयतेने कोंबुन नेत असतोनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ११,१(ड) प्राणी निर्दयतेने वागविण्याच्या कायदा सहकलम ९ म. प्रा. सं. का सहकलम ८३/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पाना. हुमने पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-**

दिनांक १९/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व इतर वाहनांवरती ८५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.